International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No. 6 July – August 2025

# स्वातंत्र्य चळवळीतील कऱ्हाड परिसरातील ठळक घटना

**प्रा. डॉ. अभय पाटील**

*इतिहास विभाग, स. गा. म. कॉलेज, कराड.*

***Corresponding Author - प्रा. डॉ. अभय पाटील***

**DOI - 10.5281/zenodo.18139029**

**प्रस्तावना:**

ब्रिटिश सरकारने सातारची छत्रपतींची गादी दि.16-05-1849 मध्ये खालसा केली. रंगो बापूजी यांनी ब्रिटिश सरकार विरोधी उठावाची तयारी केली. त्याच्या सैन्य भरतीची ठिकाणे होती. त्यापैकी कऱ्हाड एक होते. धारराव पवार,दौलता पवार (कोळे) व रामचंद्र जोशी यांनी कऱ्हाडातून 400 सैनिक रंगो बापूजींनां दिले. सन.1857 चा स्वांतत्र्य चळवळीचा मार्ग अपयशी झाल्यावर कऱ्हाड व परिसरात लोकांना जागृत करून क्रांतीच्या मार्गाने स्वांतत्र्य मिळविण्याचे प्रयत्न झाले. कऱ्हाड व परिसरातील लोकांनी आपली ताकद निरनिराळया चळवळी, सभा, परिषदा, बहिष्कार, मोर्च्यांव्दारे ब्रिटिश सरकारला दाखविण्यास सुरवात केली. कऱ्हाड व परिसरातील तरूणपिढी याकडे आकर्शित झाली. व त्यांनी स्वांतत्र्य मिळेपर्यत आपले कार्य केले. सन.1885 मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर स्वांतत्र्य चळवळीच्या कार्याला फार गती मिळाली.

**राष्ट्रीय कॉंग्रेसची शाखा स्थापना:**

राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर तिचे कार्य समाजापर्यत जावे म्हणून कऱ्हाड मध्ये 'नारो विठ्ठल घाटे, चॉंदशा मनेशा काझी, कृषाजी आबाजी, भाऊसाहेब भागवत व विठ्ठल महिपत सुपनेकर यांनी 22 नोव्हेंबर 1891 मध्ये कऱ्हाडमध्ये कॉंग्रेंची स्थापना केली.'[1] त्या नंतरच्या पुढील काळात कऱ्हाड कॉंग्रेसचे कार्य हे पांडूआण्णा शिराळकर, सुपनेकर वकिल, भाऊसाहेब भागवत हे करीत होते. पांडूआण्णा शिराळकर यांनी राष्ट्रीय कॉंग्रेस साठी कऱ्हाडमध्ये निधी जमा केला. 'सामाजिक व राजकिय जागृतीचा एक भाग म्हणून लो. टिळकांनी सन.1893 व 1895मध्ये 'गणेश उत्सव आणि शिवजंयती उत्सव'सुरू केले.'[2] त्याचे पडसाद कऱ्हाडमध्ये उमटले व हे उत्सव सुरू झाले.

**स्वदेशी चळवळ:**

स्वातंत्र चळवळीत स्वदेशी वस्तु संदर्भात मोठी जागृती करण्यात आली. कऱ्हाडमध्ये याचे वारे वाहू लागले. बाबूराव अंगापूरकर यांनी देशी कापड तयार करण्याचे माग स्थापन केले. काकासाहेब बहुलेकर, आबासाहेब धोपटे व लो.

टिळक यांनी स्वदेशी चळवळीचे महत्व कऱ्हाडकरांना पटवून दिले. या स्वदेशी चळवळीचा परिणाम लोक जागृतीसाठी झाला. 'त्यातूनच ओगले काच कारखाना उभा राहिला. अनेक कुटीर उद्योग कऱ्हाड परिसरात उभे राहिले. आगपेटया, मेणबत्या व बांगडयाचे कारखाने सुरू झाले. कऱ्हाड परिसरात स्वदेशी चळवळ लोक सहभागामूळे जोरात झाली.'[3]

**क्रांतिकारी चळवळ:**

कऱ्हाडमध्ये क्रांतीचे वारे वाहू लागले होते. नारायण जोगळेकर यांनी भूमिगत राहून सरकारविरोधी कार्य केले. भाऊसाहेब कंळबे हे अनेक घटनांशी संबंधीत होते. सातारा,कऱ्हाड, कोल्हापूर व गोवा येथील घटना मध्ये त्याचा सहभाग होता.परदेशी कापडाची होळी, स्वदेशीचे पालण,परकिय रॉकेलवर बहिश्कार इ. लढे उभे केले.'तरूणांवर धार्मिक,राश्ट्रीय संस्कार व्हावेत यासाठी 'भवानी तलवार 'नावाचे पत्रक काढले'[4]. कोल्हापुर मधून त्यांनी घातकशस्त्रे व रसायने आणली व ती क्रांतीकारकांना दिली. सन 1901 ते 1910 पर्यत भाऊसाहेब कंळबे, लक्ष्मण पराडकर, बाळकृष्ण जोशी, नारायण भावे, बाळकृष्ण बुधकर, बाबूराव अंगापूरकर, भाऊ गरूड, यानी क्रांती कार्यात भाग घेतला.

दामू दुसाने हे शिवाजी क्लबचे सदस्य होत. तरूण वयात क्रांतीकार्यात भाग घेतला. एक वर्षाची तुरूंगवासाची शिक्षा भोगली. यांचे उतर भारतिय क्रांतीकारकांशी संधान होते. क्रांती कार्यासाठी शस्त्रे, पैसा उभा करण्यात मोठा सहभाग होता.[5] नारायण विनायक (नाना) हे आगरकराचे पुतणे व चाफेकर बंधूचे सहकारी. रॅड व आयस्ट्रीन प्रकरणात द्रविडांनी दगा दिला म्हणून 'द्रविडांचा काटा काढण्यात आला त्यात नाना सहभागी होते. इंदुरच्या रेसिडेंटवर झालेल्या हाल्यातही नानाचा हात होता. ब्रिटिशांनी नानास पकडून जन्मठेप शिक्षा दिली'.[6] सातारा व कऱ्हाड येथे 'अभिनव भारत'या क्रांतीकारी संघटनेच्या शाखा होत्या. कऱ्हाड व पाटण येथील मराठा, मांग व कैकाडी समाजातील पन्नास युवक गुप्त पध्दतीने या संघटनेचे कार्य करीत. औंध बॉम्ब प्रकरणात अभिनव भारत संघटनेचे क्रांतीकारक होते. ही घटना पुढे 'सातारा कट खटला' म्हणून प्रसिध्द झाली.[7] 'सन.1916 च्या मे महिन्यात लों. टिळक यांनी होमरूल लीग ची महाराश्ट्रात स्थापना केली. त्यांनी सातारा,कऱ्हाड व कोल्हापुर येथील शिवाजी क्लब, कंळबे क्लब, हनूमान क्लब यांचा होमरूल लीगच्या प्रचारासाठी उपयोग करून घेतला.'[8] दिगंबर गोखले, आप्पासाहेब आळतेकर, भाऊसाहेब सोमण, अच्युतराव कोल्हटकर, व पांडूरंग भाटे यांनी टिळकांच्या होमरूल लीगचे कामकाज केले.

**असहकार चळवळ :**

7 नोव्हेंबर 1920 मध्ये म.गांधी कऱ्हाडला आले. त्यांनी असहकाराचा संदेश दिला. म. गांधीच्या प्रेरणेतून कऱ्हाड मध्ये प्रभातफेरी सुरू झाली. 'आप्पासाहेब आळतेकर, यशवंतराव देशपांडे मारूलकर या वकिलांनी आपल्या

वकिलीचा त्याग केला. विदेशी मद्यपान दुकानासमोर निदर्शने झाली. आप्पासाहेब आळतेकर बाबूराव गोखले यांनी असहकाराचा कार्यक्रम कऱ्हाड परिसरात, गावोगावी पोहचवला. सन. 1928 पर्यत ही चळवळ कऱ्हाड मध्ये चालू होती.'[9]

**कायदेभंग चळवळ:**

सातारा व कऱ्हाड मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कायदेभंग चळवळीचा मोठा प्रचार केला. कऱ्हाडमध्ये दानशुर गणपतराव बटाणे, हरिभाऊ लाड यांनी स्वंयसेवक शिबीरे स्थापन केली. राघूआण्णा धोपाटे, बाबूराव गोखले व गुलाबभाई बागवान यांनी कऱ्हाड परिसरात कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम लोकांना समजून सांगीतला. कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून सरकारी शाळावर राष्ट्रीय काँग्रेसचे निशाण फडकविण्याचा निर्णय झाला. टिळक हायस्कूलवर राष्ट्रीय काँग्रेसचे निशाण फडकविण्यात आले. 13,जुलै 1929 ला प्रांतिय गव्हनरने (फ्रेडरिक) कऱ्हाडला भेट दिली. त्यास काळी निशाणे दाखविण्यात आली. राघूआण्णा धोपाटे, बाबूराव गोखले ,गुलाबभाई बागवान, मारूती महाडीक याच्यावर खटले दाखल करण्यात आले.[10] तुकडेबंदी व करबंदी विरोधात कायदेभंग चळवळीत कऱ्हाडातील सर्वसामान्य जनता सहभागी झाली.

**वैयक्तीक सत्यागृह:**

नोव्हेंबर 1940 पासून वैयक्तीक सत्यागृह सुरू झाले कऱ्हाडमध्ये 'वालचंद गांधी, गौरीहर सिंहासने, आर. बी. दिवटे, पांडूरंग गोविंद पाटील, चंपाबाई भट्टड, व शिखरे यांनी ब्रिटिश सरकार विरोधात वैयक्तीक सत्यागृह सुरू केले. या सत्यागृहीनां सरकारने अटक केली.'[11]

**चलेजाव चळवळ :**

8 ऑगस्ट 1942 रोजी राश्ट्रीय कॉग्रेसने 'चलेजावचा ठराव' पास केला. त्याच रात्री राष्ट्रीय कॉग्रेसच्या वरिष्ठ नेत्यानां अटक झाली. मं. गांधीच्या अटकेची बातमी कऱ्हाडमध्ये समजताच लोकांनी हरताळ पाळला. सभा, मिरवणूका, घोषणा व सरकारी शाळावर बहिष्कार या घटनांनी कऱ्हाडमध्ये चलेजाव चळवळीची सुरवात झाली. बहिष्कारामुळे प्राथमिक व माध्यमिक शाळा बंद राहिल्या. पांडू आण्णा शिराळकर, गणपतराव आळतेकर, राघू लिमये यांना सरकारने अटक केली. यशवंतराव चव्हाण, गौरीहर सिंहासने व विठ्ठलराव पागे यांनी गुप्त बैठका घेऊन कऱ्हाडमध्ये ब्रिटिश सरकार विरोधी वातावरण तापविले.

ता. 24-08-1942 रोजी कऱ्हाड मामलेदार कचेरीवर मोर्च्याचे नियोजन करण्यात आले. त्याचे नेतृत्व उंडाळे गांवचे बाळकू आण्णा पाटील यांनी केले. काशीनाथ राजाराम देशमुख, ल. ग. कुलकर्णी तथा कासेगांवकर वैद्य, यशवंतराव चव्हाण यांनी या मोर्च्याचे नियोजन केले. कऱ्हाड मामलेदार कचेरीवर निघालेला हा विराट मोर्च्या होय. या मोर्च्यानंतर

यशवंतराव चव्हाण, गौरीहर सिंहासन हे भूमिगत झाले. यामुळे ब्रिटिश प्रशासन अस्वस्त झाले धरपकड सुरू झाली.[12] यशवंतराव चव्हाण, गौरीहर सिंहासन यांना पकडून देणाऱ्यास एकहजार रूपयांचे बक्षिस लावले. यशवंतराव चव्हाण हाती लागावेत म्हणून वेणूताई चव्हाण यांना सरकारने अटक केली. यशवंतराव चव्हाण, गौरीहर सिंहासन, ल. ग. कुलकर्णी तथा कासेगांवकर वैद्य व माधवराव जाधव यांनी 105 जणाचा एक गट स्थापन केला. या गटाने भूमिगत राहून चळवळ उभी केली.

नोव्हेंबर ‘1942 ते मार्च 1943 पर्यत या गटाने अनेक घातपाती कृत्ये घडविली. टेलिफोनच्या तारा कापणे, रेल्वे रूळ उखडणे, पगार थैल्या पळविणे, रेल्वे स्टेशन जाळणे, पोस्ट ऑफिस लुटणे, पोलिसाची शस्त्रे पळविणे अशा कित्येक घटना या काळात घडल्या.’[13] ‘या गटातील सदस्यांनी कऱ्हाड चावडी, उंब्रज व मल्हारपेठ येथील डाक बंगले लुटले आणि त्यास आगी लावल्या. टिळक व महाराष्ट्र हायस्कूल बाहेर घोषणा देऊन आगी लावल्या. शिरवडे रेल्वे स्टेशन जाळण्यात आले. कृष्णा नदीवरील पूल उडविण्याचा प्रयत्न झाला. सुर्ली घाटात टपाल मोटार लुटण्यात आली. माधवराव जाधव यांनी कऱ्हाड पोस्ट ऑफिस लुटले. या घटनांमुळे कऱ्हाडात लष्कर आणले’[14] कऱ्हाडातील माधवराव जाधव, आत्माराम जाधव, बाबूराव कोतवाल, बाबूराव काळे याना सरकारने पकडले व तुरूंगात टाकले.

**प्रतिसरकार काळातील घटना:**

जुन्या सातारा जिल्हातील प्रतिसरकार म्हणजे भारतिय स्वांतत्र्य चळवळीतील सोनेरी पान होय. क्रांतीसिंह नाना पाटील व त्याच्या सहकाऱ्यांनी चालू केलेला समांतर शासनाचा प्रयोग अदभूत होय. ब्रिटिश सरकारच्या शासनाचा लवलेश या ठिकाणी ठेवण्यात आला नाही. गनिमीकाव्याने लढून पोलादी शासन यंत्रणा खिळखिळी करणे सोपे नव्हते. म्हणून प्रतिसरकारची कामगिरी महत्वपूर्ण मानली जाते. बालिया, तामलूक, कंताई, गाझीपूर येथील प्रतिसरकारे दिर्घकाळ टिकली नाहीत. साताराचे प्रतिसरकार दिर्घकाळ टिकले. येथील प्रतिसरकारची यत्रंणा सन.1946 पर्यत आस्तीत्वात होती.

कऱ्हाडमध्ये लोकसंरक्षण, गुन्हेंगारानां शिक्षा, न्यायदान, ब्रिटिशांना सहकार्य करणाऱ्या लोकांना शिक्षा, पोलिसावर हल्ले इ. कामे करण्यात आली. सवादे, तुळसण गावात न्यायदान केले. किसन कराडकर यास खबऱ्या म्हणून पत्र्या मारल्या. टेंबू व सैदापुर मध्ये न्यायदान, श्रमदान कार्यक्रम झाले. कऱ्हाडमध्ये बाबूराव कोतवाल, माधवराव जाधव, आत्माराम जाधव, बाळू भुरके, नेमचंद शहा, शाम खोजा, शांताराम गरूड यांनी भूमिगत राहून काम केले. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी वाठार, काले, कासेगांव या ठिकाणी सभा घेतल्या. 7 जुन1943 रोजी शेणोली-भवानीनगर खिंडीत रेल्वे अडवून पगाराची थैली लुटण्यात आली.[15] या मध्ये रामराव बाळकू कणसे व शंकर बयाजी शिंदे याचा समावेश होता. प्रतिसरकारच्या पन्नास कार्यकत्यांनी

यात भाग घेतला. या घटनेचे आवाज ब्रिटिश पार्लमेंट पर्यत गेले.

सन 1943 ते जून 1946 पर्यत प्रतिसरकार कराड परिसरात कार्यरत राहिले. लोकसखा, श्रीशाहू व स्वंतत्र भारत मधून प्रतिसरकारची माहिती, लोकसमस्या, तंटे, सोडवणे व उपाय-योजनांची माहिती प्रसारीत केली जात असे. लोक न्यायालये, लवाद मंडळे स्थापन करण्यात आली. कऱ्हाड परिसरात पारतंत्र काळात लोकांनी भरीव योगदान केले.

**संदर्भः**


1. गोखले वि. पु. व देशपांडे का. धो. 'समग्र कऱ्हाड दर्शन' आ. 1, 6, डिसेंबर 2008. श्रीधर मुद्रणालय, कऱ्हाड. पृ. क्र. 35-36.
2. ठाकरे के. सि.:'छ. प्रतापसिंह आणि सातारा' म.रा.सा.सं.मंडळ मुंबई. पृ. क्र.261.
3. Sale M.C.& Sham Ogale, `Thirty years of PrabhakarLantern ,Ogalewadi 1955.p-1&2.
4. गोखले वि. पु. व देशपांडे का. धो. 'समग्र कऱ्हाड दर्शन' आ.1, 6,डिसेंबर 2008. श्रीधर मुद्रणालय, कऱ्हाड. पृ. क्र. 41-42.
5. कित्ता. पृ.क्र.-65.
6. कित्ता. पृ.क्र.-66
7. फडके य. दि.'20 व्या षतकातील महाराश्ट्र' खंड-1.श्रीविद्या प्रकाशन पुणे.1989. पृ.क्र.-247.
8. Source material for a history of freedom movement in India.khand-2.mumbai government 1957 page no.242
9. पाटील पी.डी.(संपादित)'कऱ्हाड नगरपालिका षतसांवत्सरिक स्मृतीग्रंथ'श्री लक्ष्मी नारायण प्रेस.कऱ्हाड 29 डिंसेबर1955 पृ.क्र.-148,50.
10. कित्ता. पृ.क्र.-151.
11. Home department special branch file no-800(65) A-6.1937. & Home department special branch file no.800 (74)-14.3,1943.
12. मुंबई सरकारने,केंद्रीय सरकारला पाठविलेला गोपनिय अहवाल,फाईल्स-क्रं.18. सप्टेंबर 1942.
13. कित्ता.
14. *Home department special branch file no-503.1943-44.*
15. कित्ता.